संगणक / मॉनिटर वर सॅनिटाईझर
फवारणी (स्प्रे) न करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
जलसंपदा विभाग,
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.०४/२०१९)/संकाक
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दि. १६.१०.२०२०

**शासन परिपत्रक :-**

कोव्हीड-१९ संसर्गजन्य रोगाचा फैलाव होऊ नये याकरीता शासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. सदर रोगाचा फैलाव होऊ नये याकरीता सर्वत्र सॅनिटायझर वापरण्यात येत आहे. विभागात एखादा कोव्हीड पॉझिटीव्ह रुग्ण आढळल्यास महानगरपालिका / सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संबंधित कार्यासनात तसेच मजल्यावर रोगप्रतिबंधात्मक औषधांची फवारणी करण्यात येते. तसेच काही कर्मचारी सुरक्षात्मक उपाययोजना म्हणून संगणक / मॉनिटर वर सॅनिटाईझर फवारणी (स्प्रे) करतात.

२. यासंदर्भात असे निदर्शनास आले आहे की, सदर फवारणी करतांना औषधीद्रव्य संगणकावर पडून ते संगणकांच्या आत गेल्यास संगणकाचा डिस्प्ले बंद पडतो. यामुळे विभागातील काही संगणक बंद पडल्याचे आढळून आले आहे.

३. यास्तव, सर्व अधिकारी / कर्मचारी यांना कळविण्यात येते की, रोगप्रतिबंधात्मक औषधांची फवारणी करतांना संगणकावर औषधीद्रव्य पडणार नाही याबाबत संबंधितांना सुचना देण्यात याव्यात. तसेच विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी संगणक / मॉनिटर वर सॅनिटाईझर फवारणी (स्प्रे) करु नये व संगणकावर सॅनिटाईझर वा संबंधित द्रव्य पडणार नाही याची काटेकोर दक्षता घ्यावी.

(अ. वि. पगार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. प्रधान सचिव (जलसंपदा) / सचिव (लाक्षेवि) / सचिव (प्रकल्प समन्वय) यांचे स्वीय सहायक,
२. सर्व सह सचिव / उप सचिव यांचे स्वीय सहायक,
३. सर्व अवर सचिव / सर्व कार्यासन अधिकारी, जलसंपदा विभाग.
४. संगणक कार्यक्रम कक्ष संग्रहार्थ.